# ओएनजीसी (डब्ल्यूओयु) कर्मचारी संघटना

## मान्यताप्राप्त युनियन

बंधू - भगिनींनो,

आपणा सर्वांना ज्ञात आहे कि, कर्मचारी संघटनेच्या ONGC/KS/434/2018 या पत्रानुसार C-OFF संदर्भात "उपोषणाची" नोटीस दि. 7 ऑगष्ट 2018 रोजी दिली होती. या पत्रानुसार दि. 4 सप्टेंबर 2018 रोजी सकाळी 7.00 वाजता आमरण उपोषणाची सुरुवात होणार होती. सदर नोटीस नियमानुसार डेप्युटी चीफ लेबर कमिशनर, मुंबई व चीफ लेबर कमिशनर, दिल्ली यांना देण्यात आली होती.

या पत्रानुसार आज दि. 31 ऑगष्ट 2018 रोजी डेप्युटी चीफ लेबर कमिशनर, मुंबई यांच्या ऑफीसमध्ये श्री. राजशेखरन, असि. लेबर कमिशनर यांनी बैठक घेतली. आपण युनियनच्या पत्रात वाचले असेलच वारंवार न घेतलेल्या C-OFF ची माहिती देण्यासाठी DGM-I/c IR यांच्याकडून विनंतीपत्रे जात होती. तरी ऑफशोअर मधिल OIM नी कोणत्याही प्रकारची दखल न घेतल्यामुळे संपाची नोटीस द्यावी लागली. सदर नोटीस दिल्यानंतरही कुणाचेही C-OFF शिल्लक नाहीत असा रिपोर्ट ऑफशोअरमधिल बऱ्याच प्रोसेस प्लॅटफॉमवरील OIM नी दिला. या सर्व गोष्टिंची माहिती वरील नमुद बैठकीत असि. लेबर कमिशनरना देण्यात आली.

व्यवस्थापनातर्फे हजर असलेल्या DGM-I/c IR श्री. गणेशन साहेबांनी पुढिल एका आठवड्यात C-OFF चा रेकॉर्ड उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले. सदर बैठकीत असि. लेबर कमिशनरनी मध्यस्थी केली. व त्यांनी केलेल्या विनंतीनुसार कर्मचारी संघटनेने घोषित केलेले दि. 4 सप्टेंबर 2018 रोजीपासूनचे "आमरण उपोषण" पुढे ढकण्यात येत आहे, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. यासंदर्भात पुढिल बैठक 25 सप्टेंबर रोजी घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. हि लढाई कायदेशीर आहे व हे C-OFF ज्या वर्षापासून, जेवढे आहेत ते सर्व कामगारांना मिळवून देण्यासाठी कर्मचारी संघटना बांधिल आहे.

दि. 4 वा 5 सप्टेंबर 2018 रोजी DGM-I/c IR यांनी सर्व I/c HR-ER यांची बैठक बोलाविली असून सदर बैठकीत ठोस निर्णय अपेक्षित आहे.

याबाबत ऑफशोअरमधिल सर्व कर्मचाऱ्यांना विनंती करण्यात येत आहे कि, प्रत्येक प्लॅटफॉमवरील सर्व कर्मचाऱ्यांचा C-OFF चा रेकॉर्ड विनाविलंब पाठविण्यात यावा. सदर C-OFF ची रजिस्टर मध्ये नोंद असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रतीही जोडाव्यात. सदर रेकॉर्ड Well Services, Logging, Cementing, Chemistry dept., Logging, Reservoir, Drilling, Production आदी सर्व विभागातून येणे आवश्यक आहे याची सर्वांनी नोंद घेवून हा C-OFF चा रेकॉर्ड लवकरात लवकर पाठवावा, हि विनंती.

कामगार एकता झिंदाबाद !

कर्मचारी संघटना झिंदाबाद !!

आपला नम्र,

दि. १ सप्टेंबर २०१८

(प्रदीप मयेकर)
सरचिटणीस